HOMOEOPATHY

# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी, मुंबई.

(महाराष्ट्र होमिओपॅथी वैद्यकीय अधिनियम १९६० अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे गठीत)

२३५, पेनिन्सुला हाऊस, ३रा मजला, डॉ. दादाभाई नौरोजी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. : +९१-२२-२२७० ४४०० • फॅक्स : +९१-२२-२२७०३०८६

ई-मेल : mail@mchmumbai.org • संकेत स्थळ : www.mchmumbai.org

**डॉ. नितिन ब. गावडे**

अध्यक्ष

(९८२०७३८५२७)

ई-मेल : nitingawade0143@gmail.com

## होमिओपॅथिक डॉक्टरांच्या प्रलंबित मागण्या महाराष्ट्र होमिओपॅथिक परिषदेच्या प्रयत्नांनी मार्गी

सीसीएमपी उत्तीर्ण डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन व त्यांचे अॅलोपॅथिक प्रॅक्टिस करण्याबाबतचे अधिकार, स्वतंत्र होमिओपॅथिक संचालनालय, उपसंचालक होमिओपॅथी,शासकीय होमिओपॅथिक रुग्णालयातील प्रशासकीय वैद्यकीय अधिकारी नियुक्ती, परिषदेत नियमित प्रबंधकांची नियुक्ती, आयुष विभागांतर्गत होमिओपॅथी करिता स्वतंत्र आर्थिक तरतूद, उपसंचालकांना प्रशासकीय निर्णयांचे अधिकार मिळणे, राज्यात किमान प्रत्येकी महसूली विभागात किमान एका शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना, महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम मध्ये नियमांची प्रभावीरित्या अंमलबजावणी होण्याकरिता अधिनियमामध्ये कालसंगत दुरुस्त्या तसेच परिषदेचे कामकाज सुरळीत चालण्याकरिता अनेक वर्षापासून शासनाकडे प्रलंबित असलेल्या परिषदेच्या प्रस्तावित नियम, उपनियम व परिनियम यांना मंजूरी अशा अनेक विषयांवर परिषदेचे अध्यक्ष मा.डॉ. नितिन गावडे व सक्रिय सदस्य मा.डॉ. सुनिल मुळीक यांनी परिषदेच्या ठरावाप्रमाणे पुढाकार घेऊन परिषदेच्या मार्गदर्शक मा. डॉ. सौ. रजनी इंदूलकर यांच्या माध्यमातून मा. खा. शरदचंद्रजी पवार साहेब व मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री ना. श्री. अमितजी देशमुख साहेब यांचेकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश येत असल्याचे दिसून येत आहे.

मा. खा. शरदचंद्रजी पवार साहेब व मा. ना. श्री. अमितजी देशमुख यांच्यात झालेल्या चर्चेनुसार आज दि. १ फेब्रुवारी २०२१ रोजी मंत्रालय, मुंबई येथे मा. ना. अमितजी देशमुख साहेब यांच्या अध्यक्षतेखाली व परिषदेच्या मार्गदर्शिका मा. डॉ. सौ. रजनी इंदूलकर मॅडम, परिषदेचे मा. अध्यक्ष डॉ. नितिन गावडे, व मा. सदस्य डॉ. सुनिल मूळीक यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. तसेच प्रशासनातर्फे मा. सचिव वैद्यकीय शिक्षण सौरभ विजय, संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन मा.डॉ. तात्याराव लहाने साहेब, वैद्यकीय शिक्षण उपसचिव अधिनियम श्री. कमलाकर साहेब, अवर सचिव (अधिनियम) मा. श्री. विजय शिंदे, संचालक आयुष मा. वैद्य कोहली साहेब, सहसंचालक आयुष मा.वैद्या सुडे मॅडम व इतर संबंधित सर्व मा. अधिकारी उपस्थित होते. बैठकीमध्ये प्रत्येक विषयावर सविस्तर चर्चा झाली. आवश्यक तेथे होमिओपॅथिक समस्यांबाबतची कायदेशीर व तांत्रिक बाजू बैठकीला विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित असलेले परिषदेचे माजी प्रशासक मा. डॉ. बाहुबली शहा यांनी मांडले. सर्वच विषयांवर सकारात्मक निर्णय होऊन त्यावर आठ दिवस ते तीन आठवडयांच्या मुदतीत कार्यवाही करून त्याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मा. मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या बाबतीत अधिकारी व परिषद पदाधिकारी यांच्यामध्ये समन्वय साधण्याची जबाबदारी मा. मंत्री महोदयांनी खाजगी सचिव श्री. संजय जाधव साहेब यांचेवर सोपविली आहे.

या सकारात्मक यशस्वी प्रयत्नांबद्दल होमिओपॅथिक परिषदेचे मा. अध्यक्ष डॉ. नितिन गावडे व मा. सदस्यांचे होमिओपॅथिक जगतांमधून आभार व्यक्त केले जात असून भविष्यातही होमिओपॅथिक परिषद होमिओपॅथिक डॉक्टरांच्या पाठीमागे भक्कमपणे उभी राहून त्यांच्या समस्यां सोडवेल असा विश्वासही व्यक्त केला जात आहे.